महाविद्यालयांतील अध्यापक, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील संचालक, उपसंचालक, शारीरिक शिक्षण ही समकक्ष पदे, अशासकीय अनुदानित महाविद्यायातील ग्रंथपाल, उप ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षांवरुन ६२ वर्षे व प्राचार्यांचे वय ६२ वर्षांवरुन ६५ वर्षे करण्याच्या पार्श्वभूमीवर सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याची कार्यपध्दती ठरविण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१५/प्र.क्र.११/१५/वि.शि.१

मंत्रालय विस्तार भवन,

मुंबई -४०० ०३२

तारीख: १४ जानेवारी, २०१६

वाचा -

१) **शासन निर्णय क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.२५ फेब्रुवारी, २०११

२) **शासन निर्णय क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.०५ मार्च, २०११

३) **शासन निर्णय क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०१०/(५०३/१०)/वि.शि.-१, दि.०५ मार्च, २०११

४) **शासन शुध्दीपत्रक क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३९६/११)/वि.शि.-१, दि.२३ फेब्रुवारी, २०१२

५) **शासन निर्णय क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(३७०/११)/वि.शि.-१, दि.२८ मार्च, २०१२

६) **शासन निर्णय क्रमांकः** उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५३२/११)/वि.शि.-१, दि.२२ ऑगस्ट, २०१२

प्रस्तावना -

राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय महाविद्यालये, संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने यांमधील अध्यापक, संचालक, उपसंचालक, शारीरिक शिक्षण ही समकक्ष पदे, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील ग्रंथपाल, उप ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयात ६० वर्षांवरुन ६२ वर्षे व प्राचार्यांच्या वयात ६२ वर्षांवरुन ६५ वर्षे वाढ करण्याचा निर्णय संदर्भाधीन क्र.१, २, ५ व ६ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

२. संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या याचिकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दि.३० सप्टेंबर, २०११ रोजी दिलेल आदेश विचारात घेऊन दि.५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १० व परिच्छेद १२ मधील तिन्ही समित्या रद्द करण्यात येऊन संदर्भाधीन क्र.३ येथील शासन निर्णयान्वये अध्यापक यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६० वरुन ६२ पर्यंत व प्राचार्य यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीची वयोमर्यादा ६२ वरुन ६५ वर्षे करण्याकरिता आढाव्या समित्या गठित करण्यात आल्या आहेत. तसेच संदर्भाधीन क्र.४ येथील शासन शुध्दीपत्रकान्वये विशेष अपवाद म्हणून दिनांक ३१ मार्च, २०१४ या कालमर्यादेपर्यंत ज्या सहाय्यक प्राध्यापकांनी पी.एचडी. पदवी धारण केलेली नाही, परंतु करिअर ॲडव्हान्स्मेंट स्कीमअंतर्गत फायदे देण्यासाठी त्यांना शासनाने मान्यता दिलेली आहे, अशा सहाय्यक प्राध्यापकांची प्रकरणे संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये गठित केलेल्या आढावा समितीसमोर ठेवण्यास शासन मान्यता देण्यात आली होती.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या विविध शासन आदेशानुसार प्राचार्य/अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षांवरुन ६२ व ६२ व ६२ वर्षांवरुन ६५ असे वाढविण्यात आले आहे. तथापि, हे शासन आदेश निर्गमित करण्यापूर्वी जे प्राचार्य/अध्यापक सेवानिवृत्त झाले होते, त्यांचे सेवानिवृत्तीवेतन महालेखापाल कार्यालयाकडून प्राधिकृत करण्यात आले होते व संबंधितांनी सेवानिवृत्तीवेतनाचे लाभ घेतलेले आहेत. सेवानिवृत्ती वेतनाचे वय वाढविण्याच्या आदेशांच्या परिणामस्वरुप या प्राचार्य/अध्यापकांना पुन्हा सेवेत नियुक्त्या देण्यात आल्या. अशी कार्यवाही करत असताना सेवानिवृत्तीचा दिनांक ते पुनर्नियुक्तीचा दिनांकाच्या कालावधीमध्ये या प्राचार्य/अध्यापकांच्या सेवेत खंड पडला आहे, हा खंड कसा नियमित करावा याबाबत कोणत्याही सूचना निर्गमित करण्यात आलेल्या नाहीत. तसेच ज्या प्राचार्य/अध्यापकांनी सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ घेतलेले आहेत, त्यांच्या प्रकरणी पुनर्नियुक्तीनंतरच्या सेवानिवृत्तीच्या अनुषंगाने सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली नाही. मात्र अशा प्राचार्य/अध्यापकांची सेवानिवृत्ती वेतन प्राधिकृत करण्याची प्रकरणे महालेखापाल कार्यालयाकडे प्राप्त होत आहेत. अशा परिस्थितीत शासनाच्या स्पष्ट सूचनांशिवाय निवृत्तीवेतन प्रकरणे प्राधिकृत करण्याची कार्यवाही महालेखापाल कार्यालयास करणे शक्य नाही. महालेखापाल कार्यालयाने या पार्श्वभूमीवर सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याची कार्यपध्दती ठरविण्याबाबत विचारणा केली.

४. महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे विचारात घेता, अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय महाविद्यालये, संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित शासकीय/अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने यांमधील अध्यापक, संचालक, उपसंचालक, शारीरिक शिक्षण ही समकक्ष पदे, अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील ग्रंथपाल, उप ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल यांच्या बाबतीत सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याबाबत शासन स्तरावरुन निर्देश देण्याची बाब विचाराधीन होती.

शासन परिपत्रक-

५. वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे निर्देश देत आहे :-

(i) सेवानिवृत्तीच्या वयामध्ये वाढीचा लाभ मिळालेल्या प्राचार्य/अध्यापकांना वाढीव कालावधीत अनुज्ञेय होणा-या/असणा-या वेतनातून मिळालेले निवृत्तीवेतन व उपदान आदि समायोजित करण्यात यावे.

मिळालेले निवृत्तीवेतन, उपदान आदि अनुज्ञेय वेतनापेक्षा अधिक असल्यास समायोजित केलेल्या रकमा वजा जाता उर्वरित निवृत्तीवेतन, उपदान आदि संबंधितांकडून वसूल करण्यात यावे.

(ii) सदर प्राचार्य/अध्यापक यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीनंतरच्या पुनर्नियुक्तीचा दिनांक सेवाखंड मानण्यात येऊ नये.

(iii) ज्या प्राचार्य/अध्यापकांचे सेवानिवृत्तीवेतन जुन्या सेवानिवृत्ती दिनांकानुसार महालेखापाल कार्यालयाकडून प्राधिकृत करुन सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याबाबतचे (PPO ऑर्डर) आदेश निर्गमित झाले आहेत, अशा प्राचार्य/अध्यापकांचे सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याबाबतचे आदेश रद्द करुन सुधारित सेवानिवृत्ती वेतन अदा करण्याबाबतचे आदेश काढण्यात यावेत, त्यासाठी सुधारित प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची कार्यवाही संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण/तंत्र शिक्षण यांनी करावी.

६. सदर शासन परिपत्रक वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१४६/१५/सेवा-४, दि.२९.१२.२०१५ नुसार त्यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११४१७०७५२९३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Harshwardhan Tukaram Jadhav

Digitally signed by Harshwardhan Tukaram Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Harshwardhan Tukaram Jadhav
Date: 2016.01.14 17:10:32 +05'30'

(हर्षवर्धन तु. जाधव)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. कुलगुरु, सर्व अकृषि विद्यापीठे
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ व २ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), १ व २ महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
५. सर्व सह सचिव/उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण
८. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अवर सचिव (सेवा-४), वित्त विभाग
१०.निवड नस्ती (वि.शि.१)